● सोमवार, दि. १८ नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ११२ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# मिशन ॲक्टीवेटेड; सुपडा साफ

## सोशल मिडीयावरील व्हायरल पोस्टने भाजपा उमेदवारांचे टेन्शन वाढविले?




### मराठा समाजाने शंभर टक्के मतदान करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी** - 'मराठा मार्ग' या व्हॉटस्अप ग्रुपवरील 'मिशन ॲक्टीवेटेड; सुपडा साफ' या आशयाची पोस्ट सोशल मिडीयावर तुफान व्हायरल होत असून या पोस्टमुळे भाजपा उमेदवारांच्या टेन्शनमध्ये वाढ होणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी शेवटच्या टप्प्यात आली आहे. प्रचाराचा सोमवार (दि. १८) शेवटचा दिवस आहे. सायंकाळी ६ वाजेपर्यंत उमेदवारांना प्रचार करता येणार आहे. अशातच अचानक व्हायरल होत असलेल्या या पोस्टमुळे निवडणुकीचे वातावरणच बदलून जाणार असल्याचे दिसून येत आहे. तरी येत्या २० तारखेला मतदानाच्या दिवशी मतदार कुणाच्या बाजुने कौल देतील हे २३ तारखेलाच स्पष्ट होईल.

व्हायरल होत असलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, या निवडणुकीत मराठा समाज शंभर टक्के मतदान करावे, समाजाचे मतविभाजन टाळून, निवडून येईल अशा एकाच उमेदवाराला मतदान करावे, मराठा सेवकांनी गावात बैठक घेऊन मराठा हिताची जपणूक करणारा एकच उमेदवार ठरवावा, मराठा समाजाला व आरक्षणाला विरोध करणारा एकही उमेदवार राज्याच्या निर्णय प्रक्रियेत जाणार नाही. याची खबरदारी घ्यावी, प्रत्येक मराठा बांधवांने आपल्या जवळच्या नातेवाईकांना फोन करून आरक्षणाचे महत्त्व पटवून द्यावे, सरकारने सोयाबीन तेल, कापूस बाहेरच्या देशातून आयात करून स्थानिक शेतमालाचे भाव पाडले. खतांचे, बियाण्यांचे व संसार उपयोगी साहित्याचे भाव वाढवले म्हणजे एका हाताने लाडक्या बहिणींना देऊन दुसऱ्या हाताने काढूनही घेतले आहे. हे सांगावे., लाडक्या बहिणींना मतांसाठी सरकारी तिजोरीतून अधिकृत लाच देण्यात आली आहे, ज्यामुळे राज्याच्या तिजोरीवर आठवड्याला तीन हजार कोटींचा बोजा वाढत आहे?, मराठासेवकांनी घरोघरी जाऊन जनजागृती करावी, ज्येष्ठ, अपंग, शेजारी-पाजारी सर्वांचे मतदान करून घ्यावे, मतदान करताना मराठा बांधवांच्या आत्महत्या, आरक्षणामुळे नोकरी आणि शिक्षणातून बाद होणारी पिढी, मराठा संपवण्यासाठी फडणवीसांकडून चाललेले प्रयत्न आणि अंतरवालीतील लाठीचार्ज विसरू नयेत, पुढील दोन दिवस सोशल मीडियात अधिक सक्रिय व्हावे, निवडणुका लढवून नाही तर मराठा विरोधकांना पराभूत करूनही जातीला विजय आणि प्रतिष्ठा मिळवून दिली जाऊ शकते. हे मराठा दाखवून देणार, नेते महिनाभर पळाले पण मराठे दोनच दिवसांत वातावरण फिरवून सुपडासाफ निश्चित करणार. सर्व मराठा ग्रुपवर पाठवा., मराठा एकजुटीचा विजय असो!

ही पोस्ट 'मराठामार्ग' या व्हॉटस्अप ग्रुपवरून व्हायरल होत असून मराठा बांधवांनी ग्रुप जॉईन करण्यासाठी लिंक (https://whatsapp.com/channel/0029VaE-bECIyPtY0gyl930I/2345) देखील पोस्टमध्ये देण्यात आली आहे.

## अमित शहांच्या महाराष्ट्राती सभा रद्द

**मुंबई** - महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचारा तोफा १८ तारखेला सायंकाळी थंडावणार आहेत. यासाठी रविवार आणि सोमवारी जोरदार प्रचार करण्यासाठी राजकीय पक्ष सभा आणि मिरवणुकांचे आयोजन करत आहेत. अशावेळी भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मात्र आपला प्रचार आधीच थांबविला आहे. मणिपूरमध्ये पुन्हा एकदा हिंसाचार उसाळला असून परिस्थिती चिघळल्यामुळे अमित शाह तातडीने दिल्लीकडे रवाना झाले आहेत, अशी माहिती पीटीआय वृत्तसंस्थेने दिली आहे. मणिपूरच्या जिरिबाम जिल्ह्यात तीन महिला आणि तीन मुलांची हत्या झाल्यानंतर परस्थिती चिघळली आहे. त्यामुळे शाह दिल्लीकडे रवाना झाले.

### कैलास गोरंट्याल यांच्या प्रचारार्थ परिवाराचा मतदारांशी संवाद


## मतदार सुज्ञ; केलेल्या विकास कामांची पावती देणार- सौ. गोरंट्याल, भरिव विकासकामेच विजयाची नांदी ठरणार- अक्षय गोरंट्याल

**जालना । प्रतिनिधी** - विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी अंतिम टप्प्यात आली आहे. सोमवार (दि १८) प्रचाराचा शेवटचा दिवस असून जालना विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडी काँग्रेसचे उमेदवार आ. कैलास गोरंट्याल यांच्या प्रचाराची धुरा परिवाराने आपल्या खांद्यावर घेतली आहे. सौ. संगीताताई गोरंट्याल व अक्षय गोरंट्याल हे स्वतः मतदारांच्या भेटीगाठी घेत आहेत. मतदार सुज्ञ असून विकास कामे कुणी केली याचे भान त्यांना आहे. ते कुणाच्याही अमिशाला बळी पडणार नसून केलेल्या विकास कामांची पावती देतील असा आशावाद सौ. संगीताताई गोरंट्याल यांनी व्यक्त केला आहे. त्याच प्रमाणे मतदारांचे भक्कम पाठबळ मिळत असून भरिव विकासकामेच विजयाची नांदी ठरणार असल्याचे अक्षय गोरंट्याल यांनी म्हटले आहे.

जालना शहरात शिस्तबद्ध प्रचार यंत्रणा राबवून थेट सौ. संगीताताई गोरंट्याल व अक्षय गोरंट्याल हे मतदारांशी संवाद साधत विजयी करण्याचे आवाहन करत आहेत.

जालना शहरातील प्रत्येक प्रभागात माजी नगराध्यक्षा सौ. संगीताताई गोरंटयाल आणि युवा नेते अक्षय गोरंटयाल यांनी महाविकास आघाडीतील सर्व सहकारी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना सोबत घेवून स्वतंत्र प्रचार यंत्रणा राबवत आहेत. विविध ठिकाणी कॉँर्नर बैठका, पदयात्रा आणि घरोघरी भेटी देऊन मतदारांशी थेट संवाद साधत उमेदवार आ. कैलास गोरंटयाल यांनी शहरातील पाणी प्रश्न, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यासह मतदार संघात केलेल्या विकास कामांची माहिती देवून भविष्यात जालना शहर आणि मतदार संघाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आ. कैलास गोरंटयाल यांना पुन्हा एकदा मोठया मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन मतदारांना केले आहे. महत्वाची बाब म्हणजे मतदारांकडून माजी नगराध्यक्षा सौ. संगीताताई गोरंटयाल आणि युवा नेते अक्षय गोरंटयाल यांनी केलेल्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून शहरातील प्रत्येक प्रभागात त्यांचे जोरदार स्वागत करून आ. कैलास गोरंटयाल यांना विजयी करण्याचा निर्धार मतदारांकडून करण्यात येत आहे.





जालना शहरातील बिकट असलेला पाणी प्रश्न मार्गी लावतांनाच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्यापासून ते सुरू होईपर्यंत आ. कैलास गोरंटयाल यांनी किती संघर्ष केला हे सर्व सुज्ञ मतदारांना चांगल्या प्रकारे माहीत आहे. शिवाय शहर आणि ग्रामीण भागात देखील आ. गोरंटयाल यांनी सिमेंट रस्ते, अंतर्गत जलवाहिनी व इतरही विकासाची कामे मोठ्या प्रमाणात करून मतदार संघाचा चेहरा - मोहरा बदलण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणे केला असून या कामाची पावती मतदार मतदानाच्या माध्यमातून निश्चितपणे देईल असा ठाम विश्वास सौ. गोरंटयाल यांनी विविध सभा, बैठकांमध्ये व्यक्त केला आहे.

जालना विधानसभा मतदार संघातील मतदारांचे मिळत असलेले भक्कम पाठबळ हीच आ.कैलास गोरंटयाल यांच्या विजयाची नांदी ठरणार असल्याचे युवा नेते अक्षय गोरंटयाल यांनी सांगितले. इंडिया महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मागील अनेक दिवसांपासून जालना शहर व मतदार संघात समन्वय साधून प्रचारात उतरले आहेत. प्रचारा दरम्यान मतदारांकडून मिळत असलेले भक्कम पाठबळ आणि मागील पाच वर्षात केलेल्या भरीव विकास कामांमुळे मविआचे उमेदवार आ.कैलास गोरंटयाल यांचा विजय निश्चित असल्याचा दावा युवा नेते अक्षय गोरंटयाल यांनी केला आहे.

युवा आदर्श

मतदाना ...

आखाड्यात उतरले
कितीतरी उमेदवार
निवडणूक गावाची
इथे दिसतो संस्कार
कृती कृतीत दिसावा
खरोखर सद् विचार
ग्राम मातीचे आम्ही
तसाचं शुध्द आचार
प्रलोभन बळी नको
ना हो कुणी लाचार
शब्दा शब्दा किंमत
करत असता प्रचार
लवलेश उन्मादाचा
जिंकताही ना संचार
हरलेल्याने करू नये
अपशब्दाचा उच्चार
सत्ता पवित्र तिर्थक्षेत्र
न हो कुठला दुराचार
राजकारण फलका
झळकावे रे सुविचार
मतदाना करा जरूर
दावा योग्य अधिकार
नका करू टाळाटाळ
घडवा खरा चमत्कार

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

### भाजपाचे नेते खोतकरांच्या प्रचारात सक्रिय...

## सत्ता आल्यास विकास कामांना निधी कमी पडणार नाही - अर्जुनराव खोतकर



**जालना । प्रतिनिधी** - राज्यात आणि केंद्रात महायुतीचे सरकार असल्यामुळे शेतकरी, महिला, बेरोजगार, युवक, विद्यार्थी, अपंग यांच्या खिशात विविध योजनांमुळे दोन पैसे खुळखुळत आहेत. समृद्धी महामार्गसारखे मोठे रस्ते, ड्रायपोर्ट, विविध महामंडळे, नवीन रेल्वे मार्ग असे विविध मोठमोठे प्रकल्प हे युतीच्याच काळात झाले आहेत. त्यामुळे विकासाला गती देण्यासाठी पुन्हा राज्यात युतीचेच सरकार येणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन उमेदवार अर्जुनराव खोतकर यांनी केले. इंदेवाडी, लक्ष्मीकांत नगर, गोलापांगरी, गोलावाडी (गणेशनगर) बठाण बुद्रुक, बोरखेडी, आनंदवाडी, धारकल्याण, वाखरी, तांडा. अशा विविध ठिकाणी अर्जुनराव खोतकर यांनी भेटी दिल्या. त्यावेळी बोलताना श्री. खोतकर म्हणाले की, जुना काळ आपण आठवून पहा. सततच्या लोडशेडिंगमुळे शहरी आणि ग्रामीण जनता त्रस्त झाली होती. रब्बीच्या हंगामात वीज गूल राहत असल्यामुळे शेतकऱ्यांना मोठा त्रास होता आज ते चित्र पूर्णपणे पालटले आहे. काँग्रेसने कायम जनतेला अंधारात ठेवले. जातीपातीच्या राजकारणाला प्रोत्साहन दिले. शिवसेनेने अठरापगड जातीला सोबत घेऊन प्रस्थापितांना हादरा देण्याचे काम केले आहे. केंद्रात आता महायुतीचे सरकार आहे. राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार येणार आहे. त्यामुळे विकास कामांसाठी आपल्याला निधी कमी पडणार नाही. लाडकी बहीण योजना, शेतकरी सन्मान योजना, सौर पंप योजना अशा विविध कल्याणकारी योजना जोमाने राबविल्या जातील. या योजनांच्या अनुदानात वाढ केली जाईल. लाडकी बहीण योजनेचा ज्यांना लाभ मिळाला नाही त्यांनाही या योजनेत सामावून पान २ वर

## झोपडपट्टीधारकांना तात्काळ पीआर कार्ड देणार - अब्दुल हाफिज

**जालना । प्रतिनिधी** - जालना शहरात दिवसाढवळ्या खून-दरोडे पडत आहेत, गावठी पिस्तुले, तलवारी खुलेआम सापडत आहेत. वाढत्या गुन्हेगारीमुळे जालना शहराची बदनामी होत असून, शहरात उत्तर-प्रदेश, बिहारसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र, याठिकाणचे प्रस्थापित लोकप्रतिनिधी बघ्याची भूमिका घेत आहे. शहरातील गुन्हेगारीचा बिमोड करून भयमुक्त वातावरणासाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी माझ्यासारख्या सर्वसामान्य उमेदवारास नागरिकांनी निवडून द्यावे, असे आवाहन जालना विधानसभा मतदार संघातील अपक्ष उमेदवार पत्रकार अब्दुल हाफिज यांनी केले आहे.

जालना शहरातील नूतन वसाहत, चंदनझिरा भागात अपक्ष उमेदवार अब्दुल हाफिज यांच्या प्रचारार्थ शनिवारी, रात्री जाहीर सभा झाल्या. या दोन्हीही सभांना नागरिकांचा मोठा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी या जाहीर सभेत उमेदवार अब्दुल हाफिज बोलत होते. व्यासपीठावर ऑल इंडिया मुस्लिम संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर अन्सारी, ज्येष्ठ नेते अहमद बिन सईद चाऊस, खाजा अमिरोद्दीन, जॉर्ज उगले, गणेश भालेराव, शिवराज जाधव, जयहिंद सोशल ग्रुपचे इक्बाल शेख, जुबेर पटेल, जुनेद खान आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.



पुढे बोलताना उमेदवार अब्दुल हाफिज म्हणाले की, मी गेल्या ३५ वर्षांपासून जालना शहरात काँग्रेस पक्षाचे निःस्वार्थीपणाने काम करीत होतो, मात्र मी पक्षाकडे उमेदवारी मागितली तर प्रस्थापितांनी दबावतंत्राचे राजकारण केले, हे सर्व जालनेकरांना माहिती आहे. गेल्या ३५ वर्षांपासून शहरात आलटून-पालटून सत्ता भोगणाऱ्या लोकप्रतिनिधींनी जालना शहराचा बट्ट्याबोळ केला आहे. विकासाच्या नावाने सर्वत्र बोंबाबोंब असून, सामान्यांना मूलभूत सोयीसुविधा मिळत नाही, असे सांगून अब्दुल हाफिज म्हणाले की, जालना शहरात प्रचंड गुंडागर्दी वाढली आहे. दिवसाढवळ्या खून, दरोड्यांच्या घटना घडत आहेत. शहरात गावठी पिस्तुलांचा खुलेआम वापर होत आहे, दररोज तलवारी सापडत आहे. त्यामुळे शहरातील सामान्य माणूस सुरक्षित राहिलेला नाही. शहरातील वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी पान २ वर

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४

# उमेदवारांच्या निवडणूक खर्च लेख्यांची तिसरी आणि अंतिम तपासणी पूर्ण

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने खर्च निवडणूक निरीक्षक देव प्रकाश बमनावत (आयआरएस) यांनी जालना तहसील कार्यालयात रविवार दि. १७ नोव्हेंबर २०२४ रोजी जालना जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची तिसरी आणि अंतिम तपासणी केली.

विधानसभा निवडणूकीतील उमेदवाराच्या प्रचाराच्या कालावधीत किमान ३ वेळा प्रत्येक उमेदवाराच्या निवडणूक खर्चाच्या नोंदवहीची तपासणी करण्यात येते. उमेदवारांना व्यक्तीशः किंवा आपल्या निवडणूक प्रतिनिधीमार्फत नोंदवही सादर करणे आवश्यक आहे. ९९-परतूर, १००-घनसावंगी, १०३-भोकरदन, १०२-बदनापूर आणि १०१-जालना विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या खर्चाची तपासणी करण्यात आली. विधानसभा निवडणुक प्रक्रियेमधील प्रत्येक तपासणीनंतर उमेदवाराच्या दैनंदिन निवडणूक खर्चाची नोंदवही तपासणीच्या तारखेपर्यंत स्कॅन करण्यात येऊन निवडणुक आयोगाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येत आहे. विधानसभेच्या प्रत्येक उमेदवारास ज्या तारखेस तो नामनिर्देशित झाला होता ती तारीख व निवडणुकीच्या निकाल घोषित झाल्याची तारीख या दोन्ही तारखांसह या दरम्यान त्याने केलेल्या किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेल्या खर्चाचा स्वतंत्र व अचूक लेखा (हिशेब) ठेवणे अनिवार्य आहे. उक्त मर्यादेपेक्षा जास्त रक्कम खर्च करणे किंवा प्राधिकृत करणे हे लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १२३ (६) च्या संदर्भात भ्रष्ट आचारण आहे. जालना जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघातील तिसरी निवडणूक खर्च लेख्यांची तपासणीच्या वेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा नोडल अधिकारी (खर्च) राजु सोळुंके यांच्यासह सहाय्यक खर्च निरीक्षक व लेखांकन चमुमधील सर्व अधिकारी -कर्मचारी उपस्थित होते. निवडणूक खर्च व्यवस्थापन समितीने जालना जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या खर्च लेख्यांच्या तिसऱ्या तपासणीची माहिती खालीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.




विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४

## जिल्ह्यात मतदानाच्या दिवशी मतदान केंद्र परिसरात कलम १६३ लागू

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये जालना जिल्ह्यातील ९९- परतूर, १००- घनसावंगी, १०१- जालना, १०२ - बदनापूर, १०३- भोकरदन या विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मनाई आदेश लागु करण्यात आला आहे, असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत. महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी निवडणूकीची अधिसुचना भारत निवडणूक आयोगाव्दारे प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार तात्काळ प्रभावाने आचार संहिता लागु झाली आहे. जालना जिल्ह्यातील ९९- परतूर, १००- घनसावंगी, १०१- जालना, १०२- बदनापूर, १०३- भोकरदन विधानसभा मतदारसंघातील मतदान दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणार आहे. मतदानाचे दिवशी मतदान केंद्राचे परिसरात मोठ्या प्रमाणात होणा-या मतदारांच्या गर्दीचा फायदा घेवून मतदान प्रक्रियेस अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न आणि कायदा व सुव्यवस्था बाधित करण्याचा प्रयत्न समाजकंटक लोकांकडून होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

विधानसभा निवडणूकीची मतदान प्रक्रिया खुल्या, निर्भय, शांतातमय वातावरणात पार पडणे आवश्यक आहे. तसेच निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे सदर प्रक्रियेदरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये याकरीता तसेच जालना जिल्ह्यातील ९९- परतूर, १००- घनसावंगी, १०१-जालना, १०२ - बदनापूर, १०३- भोकरदन या विधानसभा मतदार संघात मतदान केंद्रावर मतदान साहित्यासह मतदान पथक दि. १९ नोव्हेंबर २०२४ रोजी पोहचणार असून त्यांच्या जवळ इव्हीएम, व्हीव्हीपॅट व इतर संवेदनशिल साहित्य राहणार आहे. त्यास अपाय होऊ नये याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. तसेच सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून जालना जिल्ह्यातील ९९- परतूर, १००- घनसावंगी, १०१ - जालना, १०२- बदनापूर, १०३- भोकरदन या विधानसभा मतदार संघात मतदान केंद्राचे ठिकाणी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २००३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागु करणे आवश्यक झाले आहे. मतदान केंद्रापासुन १०० मीटर त्रिजेच्या परिसरात प्रचार करणे, बेकायदेशिर जमाव करणे, हत्यार बाळगणे, मतदारांना अमीष दाखवणे, मतदारांना मतदान करण्यापासुन रोखणे, धुम्रपान करणे, ज्वलनशील पदार्थ नेणे. मतदान केंद्रापासुन १०० मीटर त्रिजेच्या परिसरात कोणत्याही सार्वजनिक वा खाजगी जागेमध्ये ध्वनिवर्धक किंवा ध्वनिक्षेपक यासारखे मानवी आवाजाचे वर्धन करणारा किंवा तो तसाच्या तसा ऐकवणारा उपकरण सच वापरणे किंवा चालविणे. १०० मीटर प्रतिबंधित त्रिजेच्या क्षेत्राचे बाहेरील भागावरून ध्वनिक्षेपकांचा असा वापर करणे की, ज्यामुळे मतदान केंद्रावरील निवडणूक आयोगाचे कर्मचारी आणि मतदानासाठी येणारे मतदार यांना त्यांचे कर्तव्य पार पाडण्यामध्ये बाधा निर्माण होणार नाही. मतदान केंद्रापासुन १०० मीटर त्रिजेच्या परिसरात कोणत्याही प्रकारचे वाहन आणने. मतदारांना ने आण करण्यासाठी अनाधिकृतपणे वाहनांचा वापर करणे. मतदान केंद्रापासुन १०० मीटर परिसरात राजकीय नेत्यांचे फोटो, चिन्ह वापरणे आणि घोषणा करणे. मतदान केंद्रापासुन १०० मीटर त्रिजेच्या परिसरात हॉटेल, टेलीफोन बुथ, झेरॉक्स मशीन, फेरीवाले यांनी व्यवसाय करणे. सदरचा आदेश निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणुकीची कर्तव्य बजावणारे सर्व अधिकारी -कर्मचारी, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तैनात करण्यात आलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी आणि मतदान केंद्रावर मतदानासाठी येणारे मतदार यांना लागु राहणार नाही. सदरचा आदेश दि. १८ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजेपासुन ते दि. २० नोव्हेंबर रोजीचे रात्री १२ वाजेपर्यंत लागु राहील. असेही आदेशात नमुद केले आहे.

## मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार बंदचे आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील ९९-परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२-बदनापुर आणि १०३-भोकरदन विधानसभा मतदारसंघासाठी बुधवार दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. तरी जालना दी मार्केट ण्ड फेअर क्ट १८६२ चे कलम ५ मधील तरतुदीनूसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन बुधवार दि.२० नोव्हेंबर रोजी भरणारे आठवडी बाजार बंद ठेवावेत, असे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत. आठवडी बाजार, जनावरांचे बाजार भरणाऱ्यामध्ये जालना शहरातील जवाहर बाग व मुर्गी तलाव परिसरासह जालना, परतूर, घनसावंगी, मंठा, घनसावंगी, भोकरदन, बदनापूर तालुक्यातील सर्वच बाजारांचा समावेश आहे. या दिवशीचा बाजार अन्य दिवशी भरविण्यात यावा. असेही आदेशात नमुद आहे.




पान १ व ४ वरुन

### महायुतीचे उमेदवार ...

पिकविमा व अतिवृष्टी चे अनुदान, शेतकर्यांना मागेल त्याला सौर पंप, महिलांना लाडकी बहीण योजना मासिक १५०० रूपये, महिलांना बसमध्ये ५० टक्के सवलत, मुलींना मोफत शिक्षण, युवकांना रोजगार, वृध्दांना मोफत बस, वयोश्री व तिर्थक्षेत्र योजना यासारख्या अनेक कल्याणकारी योजना सुरू करून त्या प्रत्यक्षात अंमलात आणल्या. या योजनांचा सर्व समाजातील गोरगरीब व कष्टकरी वर्गाला न्याय मिळाल्याचे जिल्हाध्यक्ष चव्हाण यांनी खोतकर यांच्या प्रचारार्थ सांगितले. यापुढे ही महायुतीचे सरकार राज्यात आल्यास केंद्र सरकारकडून या योजना चालू ठेवण्यासाठी व विकास कामांसाठी मोठा निधी मिळेल अशी अपेक्षा श्री चव्हाण यांनी व्यक्त केली. त्यामुळे जालना विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी विरोधकांच्या भूलथापांना बळी न पडता भाजपा-शिवसेना - राष्ट्रवादी व रिपाई या महायुतीच्या उमेदवारांस आप आपल्या भागातून प्रचंड मताधिक्य देवून विजयी करण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी केले आहे.

### सत्ता आल्यास ...

घेतले जाणार आहे, अशी ग्वाही खोतकर यांनी दिली.

लाडकी बहीण योजनेमुळे महिलांनी काँग्रेस उमेदवाराचा आवाज बंद केला आहे. यामुळे तोंड लपविण्याची वेळ आलेले काँग्रेसचे उमेदवार हा पैसा जनतेच्या खिशातील असल्याचे सांगून वेळ मारून नेत आहेत. परंतु विकास कामांचा सर्वच पैसा जनतेच्या खिशातीलच असतो. पण तो जनतेसाठी खर्च करायचा असतो, याचा विसर काँग्रेसला पडलेला आहे. काँग्रेसने कितीही प्रयत्न केले तरी लाडकी बहीण योजना, शेतकरी सन्मान योजनेसारख्या लोकहिताच्या योजना युतीचे सरकार कोणत्याही परिस्थितीत बंद होऊ देणार नाही.

भाजपचे जेष्ठ नेते माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, राष्ट्रवादीचे नेते माजी आमदार अरविंदराव चव्हाण, रिपाईचे नेते एड. ब्रह्मानंद चव्हाण, भाजपचे जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, भास्कर आबा दानवे, राजेश राऊत, सिद्धिविनायक मुळे यांच्यासह महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते युतीचे उमेदवार अर्जुनराव खोतकर यांच्या प्रचारात सक्रिय सहभागी झाले आहेत. सभा, कॉर्नर बैठका, डोअर टू डोअर भेटी, मोबाईल द्वारे संपर्क असा सर्व थरातून प्रचार सुरू आहे. जनतेतून होणारे अभूतपूर्व स्वागत, वाढता प्रतिसाद पाहता अर्जुनराव खोतकर यांचा विक्रमी मतांनी विजय ठरलेला असल्याचे महायुतीचे पदाधिकारी सांगत आहेत.

उमेदवार अर्जुनराव खोतकर यांच्या सौभाग्यवती सीमाताई खोतकर, मुलगा अभिमन्यू खोतकर, बंधू अनिरुद्ध खोतकर, मुलगी दर्शना खोतकर झोल असा सर्व परिवार शहर आणि ग्रामीण भागात भेटी देऊन प्रचारात सहभागी झाला आहे. भाऊ चोवीस तास जनतेसाठी उपलब्ध असतात. अर्ध्या रात्री फोन आला तरी ते कार्यकर्त्यांसाठी धावून जातात. संकटात साथ देतात. पाणीटंचाई, दुष्काळ आणि कोरोनात त्यांनी केलेले कार्य हे सेवेची साक्ष आहे. लोकांचे पोलीस, तहसील, जिल्हा परिषद अशा विविध ठिकाणी अडवणूक होत असेल तर भाऊ तत्परतेने लोकांचे छोटे-मोठे प्रश्न सोडवतात. ठिकठिकाणी लोक हे बोलून दाखवत असून परिवाराला अर्जुनराव खोतकर यांच्या विजयाचा विश्वास देत आहेत.

### झोपडपट्टीधारकांना तात्काळ ...

सत्ताधारी आजी-माजी लोकप्रतिनिधींनी कधीही प्रयत्न केलेले दिसत नाहीत, त्यांनी पोलीस प्रमुखांची कधी बैठक घेऊन त्यांना जाब विचारलेला दिसत नाही. त्यामुळे शहरातील गुन्हेगारी वाढण्यास कारणीभूत असलेल्या लोकप्रतिनिधींना मतदारांनी घरी बसवून, आपल्याला निवडून दिल्यास, शहरातील गुन्हेगारी संपुष्टात आणून दाखवू, असे आश्वासन अब्दुल हाफिज यांनी दिले.

जालना शहरातील नूतन वसाहत, चंदनझिरा, संजयनगर, गांधीनगर, कन्हैय्यानगर,अशा झोपडपट्टया आहेत. या झोपडपट्टी भागात गोरगरीब, दलित, मुस्लिम, अल्पसंख्याक, कष्टकरी, मजुरी करणारा मोठा वर्ग राहत आहे. या भागातील मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्या जात आहे. या भागांतील नागरिकांना पीआर कार्ड देण्याच्या नावाखाली गेल्या ३५ वर्षांपासून मतांचे राजकारण करून, झुलवत ठेवल्या जात आहे. मी निवडून आल्यास तातडीने शहरातील सर्व झोपडपट्टीधारकांच्या पीआर कार्डचा प्रश्न सोडविला जाईल, असे आश्वासन उमेदवार अब्दुल हाफिज यांनी दिले आहे.


जालना शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आणि शहरातील गुन्हेगारी रोखण्यासाठी येत्या २० तारखेला मला पेनाची निब या निशाणीसमोरील बटन दाबून भरघोस मतांनी निवडून द्यावे, अशी विनंती अब्दुल हाफिज यांनी यावेळी केली.

यावेळी शब्बीर अन्सारी, अहमद बिन चाऊस, जॉर्ज उगले यांची भाषणे झाली. या कार्यक्रमास महिला, तरुण व नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

# शेतकऱ्यांनी शेतीची कामे बाजूला ठेवून मतदानाचा अधिकार बजवावा - बावला

**जालना । प्रतिनिधी** - मत आपला अधिकार आहे, तशीच आपली जबाबदारीदेखील आहे. याप्रमाणे कृषीप्रधान देशातील शेतकरी हा देशाचा महत्त्वाचा कणा त्याचप्रमाणे मतदान हा लोकशाहीच्या सशक्तिकरणाचा काना असल्याने शेतकऱ्यांनी एक दिवसासाठी हातातील शेतीचे कामे बाजूला ठेवून कुटुंबीयांसह प्राधान्याने मतदानाचा अधिकार बजावावा आणि नागरिकांनाही मतदानासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन शेतीनिष्ठ शेतकरी जावेद अब्दुल कादर बावला यांनी केले आहे.

जावेद बावला म्हणाले की, येत्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होत आहे. जिल्हा प्रशासनाच्यावतीने शतप्रतिशत मतदानासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. शेतकऱ्यांनी शंभर टक्के मतदान करून, या संकल्पनेला प्रतिसाद द्यावा. मतदान हे प्रत्येक नागरिकाचे मूलभूत कर्तव्य आहे. घटनेने आपणा सर्वांना अनेक अधिकार आणि हक्क प्रदान केलेले आहेत.



मतदान हा त्यापैकीच महत्त्वाचा अधिकार आहे. मतदान केंद्रावर दूरवर रांगा असल्यातरी लोकशाहीच्या सशक्तीकरणासाठी थोडा वेळ लागलातरी मतदान केल्याशिवाय माघारी न परतू नये. आपले मतदान केंद्र कुठे आहे, याची संपुर्ण माहिती घेवून शक्यतो सकाळीच मतदान केंद्रावर जावून आपला हक्क बसवावा आणि आपल्या शेतकरी बांधवांसह परिसरातील नागरिकांनाही मतदानासाठी प्रोत्साहित करावे. आपल्या परिसराचा, तालुक्याचा, जिल्ह्याचा, महाराष्ट्राचा, देशाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी व व्यापक राष्ट्रहितासाठी आपल्या अमूल्य मताची आवश्यकता असल्याने आपण आपले अमूल्य मत देण्यासाठी वेळ काढून येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदान करावे, असे आवाहन जावेद बावला यांनी केले आहे.

# परतूरमधील पारधी वाड्यातील शेकडो नागरिकांचा आमदार लोणीकरांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश

**परतूर । प्रतिनिधी** - महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मतदारसंघात केलेल्या विकास कामां मुळे झालेला सर्वांगीण विकास पाहता परतूर विधानसभा मतदारसंघातील मंठा व परतूर तालुक्यातील शिवसेना उबाठा गट, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट, वंचित बहुजन आघाडी व काँग्रेस पक्षातून गेल्या महिनाभरात जवळपास ५००० कार्यकर्त्यांनी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला असून. भारतीय जनता पक्षात प्रवेश होणाऱ्या कार्यकर्त्यांचा सपाटाच दररोज मंठा व परतुर तालुक्यात दिसून येत आहे.

परतूर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत आज ड.सुरेश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली अंकुश बाजीराव चव्हाण,चंद्रकांत शेषराव चव्हाण, सुरेश शेषराव चव्हाण ,शंकर बाजीराव चव्हाण , रामा मालू काळे, गोपाल रामा काळे तसेच महिला सीताबाई शेषराव चव्हाण, मंगल सुरेश काळे ,गंगा



लखन काळे, रंगुबाई शंकर चव्हाण यांच्या सह शेकडो तरुणांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी पारधी वाड्यातील उपस्थित सर्व नागरिकांनी महायुतीचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा संकल्प केला. याप्रसंगी पारधी वाड्यातील ज्येष्ठ नागरिक महिला युवक युवती मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## महायुतीचे सरकार आणण्यासाठी एक-एक आमदार महत्त्वाचा!

# अर्जुनराव खोतकर यांनाच विक्रमी मतांनी निवडून द्या - रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनिधी** - भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, रिपाई युती अभेद्य असून महायुतीचे सरकार येण्यासाठी एक एक आमदार महत्त्वाचा आहे. त्यामुळे कोणत्याही अफवावर विश्वास न ठेवता महायुतीचे अधिकृत उमेदवार अर्जुनराव खोतकर यांनाच विक्रमी मतांनी निवडून द्या असे आवाहन भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी केले.



जालना येथील हॉटेल गॅलेक्सी मध्ये भारतीय जनता पक्षाच्या वतीने एक कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास ज्येष्ठ नेते रावसाहेब पाटील दानवे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शिवसेनेचे नेते माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, उपाध्यक्ष भास्करराव दानवे, राजेश राऊत, सिद्धिविनायक मुळे, रामेश्वर भांदर्गे, सतीश जाधव ,कपील दहेकर ज्ञानेश्वर ढोबळे , सुहास मुंडे,शिकांत घुगे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, अनिरुद्ध खोतकर, मेघराज चौधरी, विष्णू पाचफुले यांच्यासह भाजप शिवसेना राष्ट्रवादी त्रिपाई युतीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी भाजप कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ज्येष्ठ भाजप नेते रावसाहेब दानवे म्हणाले की, राज्यात भाजप शिवसेना राष्ट्रवादी रिपाई युतीची महायुती आहे. महाराष्ट्रात पुन्हा महायुतीचे सरकार आणायचे आहे. त्यासाठी महायुतीला एक एक आमदारही अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे महायुतीचे सर्व पदाधिकारी नेते एक दिलाने प्रचारात सक्रिय सहभागी झालेले आहेत. भोकरदन विधानसभा मतदारसंघात नुकताच शिवसेनेचा मेळावा पार पडला. या मेळाव्यास शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे आदी पदाधिकारी उपस्थित होते. तसेच बदनापूर येथे भाजपचे उमेदवार नारायण कुचे यांच्या प्रचार कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी शिवसेनेचे नेते माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर हे स्वतः उपस्थित होते. जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातही महायुती अभेद्य आहे. निवडणुकीच्या दरम्यान विरोधक वेगवेगळ्या अफवा पसरवतील. त्यामुळे विरोधकावर विश्वास न ठेवता महायुतीचे अधिकृत उमेदवार अर्जुनराव खोतकर यांनाच विक्रमी मतांनी निवडून द्या. अर्जुनराव खोतकर यांना सर्व समाजघटकातून मिळत असलेला पाठिंबा आणि समर्थन पाहता त्यांचा विजय निश्चितपणे होणार आहे. त्यामुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांनी कोणत्याही अफवेला बळी न पडता अर्जुनराव खोतकर यांनाच निवडून द्यावे. कोणी खोटा प्रचार करीत असेल तर त्यास जाब विचारावा व पक्ष नेत्यांच्या लक्षात आणून द्यावे असे आवाहनही माजी केंद्रीय मंत्री श्री. दानवे यांनी केले.

यावेळी बोलताना उमेदवार श्री. अर्जुनराव खोतकर म्हणाले की, मागे जे झाले ते गंगेला मिळाले. आमच्या दोघांच्याही चुका होत्या आणि दोघांनाही जखमा झाल्या होत्या. यापुढे आम्ही कधीच अशा चुका होऊ देणार नाही. आगामी निवडणुका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या म्हणजे कार्यकर्त्यांच्या असणार आहे. त्यामुळे आम्ही एक दिलाने प्रयत्न करणार आहोत. महायुतीच्या कार्यकर्त्यांनी एकदिलाने जिल्ह्यातील सर्व जागा निवडून आणाव्यात असे आवाहन श्री खोतकर यांनी केले.

# परतूरमध्ये तुळशी विवाहप्रसंगी रांगोळीच्या माध्यमातून मतदान जनजागृती

**परतूर । प्रतिनिधी** - परतूर विधानसभा मतदारसंघामध्ये जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करावे, मतदानाचा टक्का वाढावा यासाठी महसूल प्रशासनाच्या वतीने विविध माध्यमातून शंभर टक्के मतदान करण्यासाठी आवाहन करण्यात असून उपविभागीय कार्यालयातील महसूल सहाय्यक सरिता गुंजकर व एसबीआय बँकेचे कर्मचारी धनंजय काळे यांनी स्वतःच्या घरी आयोजित तुळशी विवाह प्रसंगी मतदान जनजागृती करणारी रांगोळी काढून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

दिवाळीनंतर तुळशी विवाह लावण्याची परंपरा पूर्वीपासून चालत आलेली आहे. नातेवाईक, मित्रमंडळी, परिचित मंडळी इतरांना आमंत्रित करून आनंदात व उत्साहाच्या वातावरणात तुळशी विवाह लावण्यात येतो.

सध्या विधानसभा निवडणुकीचे दिवस आहेत. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे.प्रत्येक मतदारांनी मतदान करून आपला हक्क बजावावा यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालयातील महसूल सहाय्यक श्रीमती सरिता गुंजकर व एसबीआय बँकेत कार्यरत असलेले




धनंजय काळे यांनी रांगोळीच्या माध्यमातून तुळशीच्या लग्न समारंभात मतदान जनजागृती केली आहे. त्यांनी रांगोळीत रेखाटलेला आपल्या अमुल्य मताचे दान आहे लोकशाहीची शान , आद्य कर्तव्य भारतीयांचे पवित्र कार्य मतदानाचे इतर मजकूरातील रांगोळीद्वारे जनजागृती केली आहे.

त्यांच्या या आगळ्यावेगळ्या मतदान जनजागृती चर्चा शहरात होत आहे.

विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करावे, मतदानाचा टक्का वाढावा यासाठी निवडणूक प्रशासन सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे. शहरात ठिकठिकाणी फलक लावून जनजागृती केली गेली आहे.

तुळशी विवाहाच्या माध्यमातून रांगोळीद्वारे मतदान जनजागृती केली आहे.मतदारांनी उस्फुर्तपणे मतदानाचा हक्क बजावून लोकशाही बळकट करावी.

# नामाचा जप भक्ती भाव निर्माण करतो - महेश गिरी महाराज





**टेंभुर्णी । प्रतिनिधी** - सतत ४७ वर्षापासून, टेंभुर्णी मध्ये भक्ती नामाचा जप होतो, कार्तिक स्नानाचा कार्यक्रम संपन्न होतो. महिनाभर कार्तिक स्नान चालते. यानिमित्त पंधरा दिवस गावातून भक्ती फेरी होते. मोबाईलच्या जमान्यातही भक्तीचा संगम आजही टेंभुर्णी नगरात सुरू असतो. अनेक परंपरा या गावांमध्ये आहेत या परंपरेपैकी कार्तिक स्नानाची परंपरा ४७ वर्षापासून चालू आहे. टेंभुर्णीतील संत चंदन बाबा यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या या भक्तिमार्गाचा त्यांच्या पश्चात हा भक्तिमार्ग अखंडपणे सुरू आहे. कै.लक्ष्मण कौसाजी, कै. मारोतराव देशमुख, कै. रंगनाथ भागवत, कै. रावजी उखर्डे, यांच्या पुढाकाराने, गंगाराम धनवाई, महादू भागवत, रघुराम उखर्डे, तानाजी उखर्डे रामकिसन सोरमारे,हरिभाऊ जाधव, रामदास डोमाळे, शेणफळ उखर्डे, रामचंद्र भागवत, शालिग्राम धनवाई, सुरेश उखर्डे, बाळू ढोबळे ज्ञानेश्वर काठोळे, किसन धनवाई,भगवान पवार, गणेश उखर्डे शंकर उखर्डे, तसेच अनेक भाविक भक्त या भक्ती फेरीमध्ये असतात. भक्तिमय मार्गाने ही फेरी टाळमृदुंगाच्या गजरामध्ये गावातून निघत असते. भक्ती मे वातावरणामध्ये गावातील वातावरण अगदी आनंदमय होऊन जाते. कार्तिक पौर्णिमेला या भक्ती फेरीची सांगता होते. या सांगता फेरी निमित्त झालेल्या कार्यक्रमांमध्ये, सकाळी दत्त मंदिरावर महापूजा होते अभिषेक होतो. तसेच भंडाऱ्याच्या कार्यक्रमाच्या पूर्वी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून हरिभक्त परायण जनार्दन स्वामी मठाचे महेश गिरी महाराज उपस्थित होते. त्यांनी आपल्या प्रवचनामध्ये भाविकांना नाम जप करायला सांगितले.

देवाचा ईश्वराचा नाम जप करण्यातून शक्ती निर्माण होते भक्ती निर्माण होते आणि भक्तिमय वातावरणामध्ये भर पडते. समाजामध्ये संस्कार निर्माण होतात. समाज सुसंस्कृत होण्यासाठी अशा पुण्य कार्यक्रमांची गरज असते आणि ती या टेंभुर्णी नगरात होते हे एक महाभाग्य आहे. टेंभुर्णीचे ग्रामदैवत दत्त मंदिर या ठिकाणी या भक्ती मार्गाला सुरुवात होते हे एक गावा गावाचे भूषण आहे. या भक्तीमय मार्गाचा आज भंडाऱ्याच्या कार्यक्रमाने सांगता होत आहे. अन्नदानाने महापुण्य होते म्हणून. अन्नदान केले पाहिजे. हेही त्यांनी याप्रसंगी आवर्जून सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरिभक्त परायण रघुराम उर्खर्डे यांनी केले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून दत्तसंस्थांचे अध्यक्ष देवराव देशमुख, सचिव रामदेव, संस्थांची संचालक विश्वस्त उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, पीजी तांबेकर सर, गणेश सोमानी पवन देशमुख , दगडूबा उ,खर्डे, रमेश जाधव, भानुदास इंगळे, कमळाची सपकाळ, बोराडे, रामेश्वर जोशी भीमराव जमदाडे, रामराव जमदाडे,तसेच अनेक भाविक भक्त या कार्यक्रमास उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# सृष्टी डोईफोडे राष्ट्रीय स्तरावर निवड; क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी

**जाफराबाद । प्रतिनिधी** - पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल, प्रभाकर डोईफोडे यांची कन्या कुमारी सृष्टी प्रभाकर डोईफोडे हिने नुकत्याच रत्नागिरी येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धा मधील गोळा फेक व थाळीफेक या या दोन्ही खेळांमध्ये द्वितीय क्रमांक पटकून तिची निवड राष्ट्रीय स्तरावर लखनऊ येथे होणाऱ्या स्पर्धा साठी झालेली आहे.


त्यामुळे तिचा सत्कार देऊळगाव राजा हायस्कूल देऊळगाव राजा याचे अध्यक्ष माननीय सुबोधजी साउजी व इतर कमिटी मेंबर तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री कोल्हे सर व इतर सर्व शिक्षक यांनी तिचा सत्कार केलेला तसेच पोलीस स्टेशन ज्या प्रभात येथील श्री पी आय इंगळे साहेब एपीआय पवार मॅडम पीएसआय पठाडे साहेब पीएसआय तायडे साहेब पीएसआय पवार साहेब आहे व इतर सर्व अधिकारी कर्मचारी यांनी सुद्धा तिला शाल श्रीफळ देऊन सत्कार केलेला आहे. तसेच तिचे महेश वैद्य, कृष्णा पठाडे, गिराम , भापकर , चंदनशिवे, शेजुळ, मस्के, लक्कस, तसेच सिद्धार्थ कॉलेजचे प्राचार्यदेशमुख,प्रा.वैद्यसर, क्रीडा विभाग वाहेद पटेल, नवभारत चे उप प्राचार्य दत्ता देशमुख, प्रेस कॉन्सिल पत्रकार संघांचे तालुका अध्यक्ष अशपाक शेख, यांनी अभिनंदन केले आहें. व तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिलेल्या आहेत.



## राजकीय नेते, स्टार प्रचारकांना प्रचार संपल्यानंतर मतदार संघ सोडण्याचे आदेश

**जालना** - भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मतदान संपण्याच्या ४८ तास अगोदर म्हणजेच दि. १८ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता जालना जिल्ह्यातील ९९- परतूर, १००- घनसावंगी, १०१- जालना, १०२- बदनापूर, १०३ - भोकरदन या विधानसभा मतदार संघातील मतदार नसलेले आणि बाहेरुन आलेले सर्व राजकीय नेते, पदाधिकारी, पक्ष कायकर्ते, प्रचाराची धुरा सांभाळणारे सर्व व्यक्ती व प्रचाराकरीता आलेल्या स्टार प्रचारकांना जालना जिल्ह्याच्या हद्दीत उपस्थित राहण्यास मनाई करण्यात आली आहे. असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत. महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी निवडणूकीची अधिसुचना भारत निवडणूक आयोगाव्दाद्वारे प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार तात्काळ प्रभावाने आचार संहिता लागु झाली आहे. जालना जिल्ह्यातील ९९- परतूर, १००- घनसावंगी, १०१- जालना, १०२- बदनापूर, १०३- भोकरदन विधानसभा मतदारसंघातील मतदान दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणार आहे. सदर आदेश दि. १८ नोव्हेंबर २०२४ रोजीचे सायंकाळी ६ वाजेपासुन ते दि. २० नोव्हेंबर रोजीचे रात्री १२ वाजेपर्यंत अंमलात राहणार आहे.

# हरिराम तिवारी यांना बंधु शोक



**मंठा । प्रतिनिधी** - येथील ज्येष्ठ पत्रकार हरिराम तिवारी (बाबुजी) यांचे धाकटे बंधु डॉ राजेन्द्र तिवारी यांचे मालेगाव (वाशिम) या राहत्या गावी तीव्र हृदय विकाराने ६८ व्या वर्षी शनिवार १६ नोव्हेंबर २०२४ रोजी निधन झाले. त्यांचे पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून व नातू असा परिवार आहे. स्थानीय मोक्षधाम मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. ज्यात वैद्यकीय, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रातील व्यक्ति सामिल झाले होते. डॉ आशिष तिवारी यांचे ते चुलते होत.

# संतोष खेरुडकर यांना पितृशोक

**जालना । प्रतिनिधी** - शहरातील जुना जालना भागातील शिवनगर येथील रहिवाशी संतोष (बाळू) खेरूडकर यांचे वडील मधुकरसा सदाशिवसा खेरुडकर यांचे आज दि.१७ नोव्हेंबर रविवार रोजी पहाटे ३ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समई ते ८१ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सूना, नातवंडं असा परिवार असून त्यांच्या पार्थिवावर छत्रपती संभाजीनगर रोडवरील रामतीर्थ स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, समाज बांधव, मित्र मोठया संख्येने उपस्थित होते.



# सामाजिक न्यायासाठी खोतकर यांना विजयी करा

## लहुजी शक्ती सेनेचे युवा प्रदेशाध्यक्ष सचिन क्षीरसागर यांचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्राचे कल्याण आणि लोक हिताच्या कार्यासाठी लहुजी शक्ती सेना महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभी असून समाजकारण आणि राजकारणात जातीय भेदभाव न करणारे शिवसेना उपनेते, माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी सामाजिक न्यायाची परंपरा जोपासली आहे. तोच सामाजिक न्याय अधिक गतीमान करण्यासाठी या निवडणुकीत धनुष्यबाण निशाणी समोर बटण दाबून खोतकर यांना मोठ्या मताधिक्यांनी विजयी करा. असे आवाहन लहुजी शक्ती सेनेचे युवा प्रदेशाध्यक्ष सचिन क्षीरसागर यांनी केले.

जालना विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार अर्जुनराव खोतकर यांना लहुजी शक्ती सेनेने पाठिंबा दर्शविला असून त्यांच्या प्रचारार्थ युवा प्रदेशाध्यक्ष सचिन क्षीरसागर यांनी पदाधिकारी व लहुसैनिकांसमवेत रामनगर, बाजीउम्रद, मौजपुरी, दहिफळ, ब्राह्मण खेडा, मानेगाव बु,मानेगाव ( ग), गोल्हा, सह जालना शहरातील मातंग समाज बहुल वस्त्यांमध्ये जाऊन कॉर्नर बैठका, रॅलीद्वारे घरोघरी जात मतदारांशी थेट संवाद साधला.

सचिन क्षीरसागर या वेळी बोलतांना म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने मातंग समाजाला न्याय देण्याची भूमिका घेऊन ध्येयधोरणे आखली आहेत, बार्टीच्या धरतीवर स्वतंत्र आर्टीची स्थापना करण्यात आली.लहुजी साळवे यांच्या अंतरराष्ट्रीय स्मरकासाठी १०१ कोटी रुपये देऊन जमीन संपादित केली असून स्मारक उभारले जात आहे. असे सचिन क्षीरसागर यांनी नमूद केले. तथापि लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक विष्णू भाऊ कसबे यांनी राज्यात महायुतीला पाठिंबा दर्शविला असून सामाजिक न्याय वृद्धिंगत करण्यासाठी अर्जुनराव खोतकर यांचे नेतृत्व सक्षम आणि प्रेरणादायी असल्याने त्यांना विजयी करावे असे आवाहन सचिन क्षीरसागर यांनी केले .यावेळी त्यांच्या समवेत युवा सेनेचे सचिव अभिमन्यू खोतकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासकीय संचालक राहुल गवारे,छत्रपती फाउंडेशन चे सुनील रत्नपारखे, अंकुश राजगिरे, ड.अश्फाक पठाण,किरण शिरसाठ,संतोष निकाळजे, सुनील लाखे,रामेश्वर आंभोरे, सुधाकर लाखे,संजय महापूरे,आकाश कसबे यांच्या सह पदाधिकारी, महिला,युवती,युवक व लहु सैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.





आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रचारार्थ परतूर शहरातून रॅली काढण्यात आली. या रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. या रॅलीत भाजपाचच्या पदाधिकारी-कार्यकर्त्यांसह शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), रयत क्रांती संघटना व मित्र पक्ष महायुतीचे पदाधिकारी -कार्यकर्ते उपस्थित होते.

# महायुतीचे उमेदवार खोतकर यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा- अरविंदराव चव्हाण

**जालना । प्रतिनिधी -** जालना विधानसभा मतदारसंघातून शिवसेना- भाजपा- राष्ट्रवादी व रिपाई या महायुतीचे उमेदवार अर्जुनराव खोतकर यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांनी केले आहे. जालना विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागात श्री. चव्हाण हे खोतकर यांच्या प्रचारासाठी गांव, तांडे व वस्त्यांमध्ये जावून प्रत्यक्ष मतदारांच्या भेटी घेत असून त्यांच्या या प्रचार दौ-यास कार्यकर्ते व मतदार मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत आहे.

राज्यातील महायुतीच्या सरकारने गेल्या अडीच वर्षात अनेक लोकहीताचे निर्णय घेतल्याचे जिल्हाध्यक्ष माजी आ. अरविंदराव चव्हाण यांनी या प्रचार दौ-यानिमित्त सांगितले. त्यामध्ये मुख्यतः शेतकर्यांना मोफत वीज, एक रुपयामध्ये पिक विमा, **पान ४ वर**

मतदान करणे हे आपले कर्तव्य आहे आणि लोकशाहीने दिलेला हा आपला अधिकार आहे. त्यामुळे

## चला मतदान करूया, आपले राष्ट्रीय कर्तव्य बजावूया



# माझं मत माझा अधिकार

तुमचे अमुल्य मत
तुमचा विकास घडवेल
लोकशाहीला बळकट करेल

आमचे वाचक, जाहिरातदार, हितचिंतक यांच्यासह सर्व मतदार जनतेस आवाहन आहे की, येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान अवश्य करा...

-संपादक, युवा आदर्श




## एक नैतिक मतदार व्हा...

निवडणुकीत लाच घेणे आणि लाच देणे अपराध आहे. मतदानासाठी पैसे, मद्य किंवा मोफत भेटवस्तू यांचा समावेश लाचेमध्ये होतो.

cVIGIL

सीविजील मोबाईल ॲप डाऊनलोड करा, गैरव्यवहाराच्या घटना नोंदविण्यासाठी छायाचित्र/व्हिडीओ क्लिक करुन अपलोड केल्यास भरारी पथक हे कार्यवाही करण्यासाठी ऑटो लोकेशनच्या मदतीने त्वरीत घटनास्थळी पोहचतील.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.